पुढारी







कोल्हापूर : १) राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त आयर्न मॅन खेळाडूंचा सत्कार करताना जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर साखरे. सोबत शाहू मॅरेथॉनचे पदाधिकारी-कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी. २) शिवाजी विद्यापीठात 'फिट इंडिया' चळवळीअंतर्गत आयोजित रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ३) राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर मेजर ध्यानचंद प्रतिमेचे पूजन करताना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. चंद्रशेखर साखरे. सोबत अन्य मान्यवर.

# रॅली, खेळाडूंचे गौरव अन् प्रबोधन

## संस्था-संघटनांच्या वतीने विविध उपक्रमांनी आंतरराष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

क्रीडाविषयक जनजागृती रॅली, राज्य-राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचे गौरव आणि ज्येष्ठ खेळाडू-अधिकाऱ्यांची प्रबोधनपर व्याख्याने अशा उपक्रमांनी 'शाहूनगरी' कोल्हापुरात गुरुवारी आंतरराष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यात खेळाडू, पदाधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, खेळाडू आणि क्रीडाप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीदिनी (२९ ऑगस्ट) भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो.

**क्रीडा जागृती प्रभात फेरी**

क्रीडा व युवक सेवा विभाग क्रीडा उपसंचालक, जिल्हा क्रीडा कार्यालय, महानगर पालिका, तालीम-मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा जागृती प्रभात फेरी काढण्यात आली. गुरुवारी सकाळी प्रभात फेरीचा प्रारंभ जुना राजवाड्यातील आंतरराष्ट्रीय क्रीडा कीर्ती स्तंभापासून झाला. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्तंभाजवळ रॅलीचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू अनिकेत जाधव, आर. डी. पाटील, एस. व्ही. सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले. शहरातील प्रमुख मार्गावरून फिरून रॅली मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर पोहोचली. तेथे खेळाडूंचा सत्कार व शाळांना अनुदान वाटप आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सरिता यादव, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे, क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते बिभीषण पाटील, संभाजी वरुटे, विष्णू जोशीलकर, विजय साळोखे- सरदार, सुभाष पवार आदी उपस्थित होते.

**विद्यापीठात फिट इंडिया चळवळ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार शिवाजी विद्यापीठाशी संबंधित प्रत्येक घटकाने 'फिट इंडिया चळवळी'त सहभागी होऊन स्वतःच्या आरोग्य रक्षणाबरोबरच देशाच्या आरोग्याचेही संवर्धन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये 'फिट इंडिया मुव्हमेंट' योजनेचा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे तसेच पंतप्रधान मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरुवारी सकाळी करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवकालीन युद्धकलांच्या प्रात्यक्षिकांनी कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित झाला.

यानंतर विद्यापीठ परिसरातून सुमारे ५ कि.मी. अंतराची रॅली काढण्यात आली. यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह एक हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले.

**शाहू मॅरेथॉनतर्फे खेळाडूंचा गौरव**

बिनखांबी गणेश मित्र मंडळाच्या शाहू मॅरेथॉनच्या वतीने जुना राजवाडा परिसरातील आंतरराष्ट्रीय क्रीडा कीर्ती स्तंभाच्या' साक्षीने 'आयर्न मॅन' खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उत्तम फराकटे, वरुण कदम, यश चव्हाण, अतुल पवार, वैभव बेळगावकर, अमर धामणे, सुप्रिया निंबाळकर, कुमार ब्रिजवानी, बाबासाहेब पुजारी यांच्यासह प्रशिक्षक उदय पाटील यांना गौरविण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर साखरे, मंडळाचे अध्यक्ष किसन भोसले, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते विजय मोरे यांच्या हस्ते गौरव झाला. यावेळी फुटबॉलपटू सुरेश पाटील, बाबू घाटगे, लालासो गायकवाड, चंचल देशपांडे, संपतराव जाधव, बाळासाहेब पाटील, शशिकांत कुलकर्णी, द्वारकानाथ नायडू, चंद्रकांत झुरळे आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर स्पोर्टस् असोसिएशन**

छत्रपती शाहू स्टेडियमवर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन केएसएचे सचिव माणिक मंडलिक यांच्या हस्ते झाले. यावेळी संभाजीराव पाटील-मांगोरे, नितीन जाधव, जिम्नॅस्टिक प्रशिक्षक संजय तोरस्कर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# स्वत:बरोबरच देशाचे आरोग्य जपा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पंतप्रधानांच्या आवाहनानुसार शिवाजी विद्यापीठाशी संबंधित प्रत्येक घटकाने 'फिट इंडिया चळवळी'त सहभागी होऊन स्वतःच्या आरोग्याबरोबरच देशाच्या आरोग्याचेही संवर्धन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

राष्ट्रीय खेल दिनानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये 'फिट इंडिया मुव्हमेंट' योजनेचा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे, पंतप्रधान मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सभागृहात करण्यात आले. विद्यापीठ कॅम्पसमध्ये काढण्यात आलेल्या रॅलीच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. महाराष्ट्रातील लाठीकाठी, तलवार आणि दांडपट्टा फिरवण्याच्या प्रदर्शनावेळी तर विद्यार्थ्यांच्या उत्साहाला बहर आला. विद्यापीठ परिसरातून सुमारे पाच किलोमीटरची रॅली काढण्यात आली. एक हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

# एक हात मैत्रीला, 'एनएसएस'ची साथ

## रंकाळा परिसर झाला टकाटक : स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

सानेगुरूजी वसाहत, ता. २९ : 'एक हात मैत्रीचा' या ग्रुपला सातारा तसेच सांगली जिल्ह्यांतील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची साथ मिळाली आणि रंकाळा तलाव परिसर दोन दिवसांत अगदी टकाटक झाला. विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून स्वच्छतेला हातभार लावला.

वाठार स्टेशन कॉलेज, तळ माऊली, सातारा आणि वाघोली कॉलेजचे विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले. गेल्या चार महिन्यांपासून महापालिका आयुक्तांनी रंकाळा तलावाच्या स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केले आहे. शाहू स्मृती उद्यान परिसरातील तळ्यातील गाळ काढला. अंबाबाई दर्शनानंतर रंकाळा तलाव आकर्षणाचा केंद्रबिंदू असल्याने हा परिसर नेहमी स्वच्छ कसा राहिल यासाठी महापालिका, स्वयंसेवी तसेच सामाजिक संस्थांचा प्रयत्न असतो. रंकाळ्यावर फिरायला येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पूर्वी दिसली रिकामी जागा की कचरा अशी अवस्था होती. अलीकडच्या पंधरवड्यात स्वच्छतेकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे स्वच्छतेसाठी 'एक हात मैत्री'च्या ग्रुपने पुढाकार घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची साथ मिळाली. सुमारे साडेचार किलोमीटर अंतराच्या परिसरात गेल्या दोन दिवसांत स्वच्छता मोहीम झाली. एक हात मैत्रीचा या ग्रुपचे सदस्य स्वच्छतेच्या कामी नेहमी रस्त्यावर उतरतात. सातारा तसेच सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या तसा रंकाळा तलावाच्या स्वच्छतेची काही संबंध नाही. रंकाळा चौपाटी, राजघाट, रंकाळा उद्यान, पदपथ, इराणी खाण, क्रशर चौक ते शाहू स्मृती उद्यान, तांबट कमान परिसर, पद्माराजे उद्यान या परिसरात प्लास्टिक तसेच अन्य कचरा उचलला गेला. पूर्वी स्वच्छता म्हटले की ते महापालिका कर्मचाऱ्यांचे काम आहे यात आपला काही संबंध नाही, असे समज असायचा. आता मात्र गैरसमज दूर झाला असून रंकाळाप्रेमी नागरिक, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी रंकाळा हा आपलाच असल्याच्या भावनेतून कष्ट घेत आहेत. राजेश कोगनुळकर, वैभव जाधव, झाकीर जमादार, संग्राम पाटील, निशिकांत सरनाईक, चैतन्य ग्रुपचे अशोक चौगले आदी स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.



**कोल्हापूर : रंकाळा स्वच्छता मोहिमेत 'एक हात मैत्री' ग्रुप व एनएसएसचे विद्यार्थी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2019
तरूण भारत

# विद्यापीठात संविधानावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## 'डॉ. आंबेडकर यांचे विचार' यावर पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून 'डॉ. आंबेडकर यांचे विचार यावरील पदव्युत्तर पदविका' (पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डॉ. आंबेडकर थॉट) व 'भारतीय संविधान यावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम' (सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टीटयूशन) सुरू केला आहे. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे या अभ्यासक्रमाचे अध्यापन व अध्ययन चालणार आहे.

भारतातील प्रत्येक नागरिकाला संविधानाची माहिती असणे आवश्यक आहे. हे महत्त्व लक्षात घेऊन भारतीय संविधानावर प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार केला असून त्याच्या प्रवेशाकरिता दहावी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या विचारावर जगभरातील विविध विद्यापीठांमध्ये अभ्यास व संशोधन सुरू आहे. अनेकांना डॉ. आंबेडकरांच्या



विचाराविषयी आपुलकी, जिज्ञासा व कुतूहल आहे. ऐकीव माहितीपेक्षा त्याबाबत प्रत्यक्ष ज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याच्या प्रवेशाकरिता कोणतीही पदवी उत्तीर्ण झालेले विध्यार्थी पात्र आहेत. अधिक माहितीसाठी अभ्यास केंद्राशी संपर्क साधवा, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

**विद्यापीठ संकेतस्थळावर माहिती उपलब्ध**

# ‘भारतीय संविधान’वर प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाने चालू शैक्षणिक वर्षापासून डॉ. आंबेडकर यांचे विचार यावरील पदव्युत्तर पदविका (पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डॉ. आंबेडकर थॉट) व ‘भारतीय संविधान यावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम’ (सर्टिफिकेट कोर्स इन इंडियन कॉन्स्टिट्यूशन) सुरू केला आहे. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे या अभ्यासक्रमाचे अध्यापन व अध्ययन चालणार आहे.